




Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड

# जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!








संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : ७९८ वा | सोमवार दि. १० जून २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये


# महाभ्रष्टाचारी अंभोरेंचे नाना प्रताप होऊ लागले उघड...

## आपल्याच सहकाऱ्यास धमकी, मानसिक त्रास दिल्याचा गंभीर आरोप

**जनसंचलन/बुलढाणा**

येथील जिल्हा रुग्णालयातील कर्मचारी एस. एल.अंभोरे यांची नाना प्रताप आता दिवसेंदिवस उघड होऊ लागले आहेत.अधिकाऱ्यांशी अर्थपूर्ण संगनमत करून पात्रता नसतानाही वैद्यकीय विभागाचा पदभार अवैधरित्या मिळवणारा अंभोरे नावाचा कर्मचारी भ्रष्टाचार करण्यासाठी आपल्याच अधिकाऱ्यांना विविध प्रकारे त्रास देत असल्याचे उघड झाले आहे. यासंदर्भात रुग्णालयातील कनिष्ठ लिपिक विशाल तेजराव वाघ यांनी जिल्हा शल्यचिकित्सकांना वारंवार अवगत केले जिल्हा शल्यचिकित्सकांनी याकडे दुर्लक्ष केल्याने अंभोरे आणखीन मस्तवाल होऊन भ्रष्टाचार करीत असल्याचे दिसून येत आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या वतीने मागील काळातील तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सोनटक्के,डॉ.पंडित,डॉ. तडस व काही प्रभारी जिल्हा शल्य चिकित्सकसह भांडारपाल जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचार व भ्रष्टाचारी यांचा अभ्यास केल्यानंतर एक बाब निश्चित झाली आहे की, जिल्हा रुग्णालयात भ्रष्टाचाऱ्यांचीच चलती आहे. भ्रष्टाचाऱ्यांना वाट्टेल त्या पातळीवर जाऊन पाठबळ मिळते आहे. वरिष्ठ अधिकारी देखील भ्रष्टाचाऱ्यांत सामिल आहेत की काय, अशी शंका आता येऊ लागली आहे. कारण वीजतंत्री एस. एल. अंभोरे या व्यक्तीची वैद्यकीय विभागाचा कामकाज सांभाळण्याची शैक्षणिक पात्रताच नाही. तरीही जिल्हा शल्यचिकित्सकांकडून

### पोस्टमार्टम ११

त्यांच्याकडे हा पदभार देण्यात येत आहे. ज्या कोण्या अधिकाऱ्याकडे हा पदभार असतो, त्याला वरिष्ठांशी हातमिळवणी करून वीजतंत्री एस.एल.अंभोरे व त्यांचे काही चेलेचपाटे संबंधित अधिकाऱ्यास धमक्या देणे, धाकदपट करणे, त्यांच्या कामकाजात हस्तक्षेप करणे, असे प्रकार करीत असतात.अंभोरे यांना अधिकाऱ्यांकडून प्रचंड पाठबळ मिळत असल्या कारणाने अंभोरे आता एव्हढे भयंकर झाले आहेत की, ते दिवसाढवळ्या, राजरोसपणे भ्रष्टाचार करीत आहेत. विशेष म्हणजे त्यांच्या भ्रष्टाचाराकडे वरिष्ठ अधिकारी ते इतर सर्व संबंधित अधिकाऱ्यांपर्यंत सारेच जण अंभोरे यांच्या गंभीर कामकाजा कडे साफ दुर्लक्ष करीत आहेत. जेंव्हा वरिष्ठ अधिकारी कनिष्ठ अधिकाऱ्याच्या भ्रष्टाचाराकडे दुर्लक्ष करतात, तेंव्हा त्यामध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांचाही सहभाग असण्याचीच दाट शक्यता असते. ही शक्यता जर दूर करायची असेल, तर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तात्काळ अंभोरे यांच्यावर भ्रष्टाचार केल्याप्रकरणी कारवाई करणे गरजेचे आहे. परंतु तसे होताना दिसून येत नाही. वैद्यकीय विभागाचा गेल्या अनेक दिवसांपासून कारभार सांभाळणारे विशाल तेजराव वाघ यांनी वारंवार जिल्हा शल्यचिकित्सकांकडे अंभोरे यांच्या पापांचा पाढा वाचला होता. त्यांनी या संदर्भात अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांकडेही तक्रारी केल्या होत्या. परंतु अंभोरे यांच्या भ्रष्टाचाराकडे जाणुनबुजून दुर्लक्ष केले जात आहे. या माध्यमातून जिल्हा रुग्णालयाचे वरिष्ठ अधिकारी स्वतःच भ्रष्टाचाराला खतपाणी घालण्याचे काम करीत आहेत, हे दिसून येते. अंभोरे वैद्यकीय विभागाच्या कामजासाठी एव्हढे अडेल का आ-हेत की, या विभागाच्या माध्यमातून भ्रष्टाचार करण्यासाठी अक्षरशः वाट्टेल त्या थराला जाण्याचे काम करीत आहेत. या प्रकारामुळे कनिष्ठ लिपिक विशाल वाघ यांना प्रचंड मानसिक त्रास होत असल्याचे त्यांनी वारंवार वरिष्ठांना सांगितले. मात्र,




निगरगट्ट झालेले वरिष्ठ हे याकडे दुर्लक्ष करीत आहेत. सर्वांत मोठा मुद्दा आहे तो भ्रष्टाचाराचा. बेकायदेशीरपणे बिले काढणे, पात्रता नसलेल्यांना प्रमाणपत्रे वाटणे, यामध्ये प्रचंड भ्रष्टाचार होतो आहे. हा भ्रष्टाचार आता जगजाहीर झालेला आहे. परंतु त्यावर कुठेही कारवाई होताना दिसून येत नाही. त्यामुळे रुग्णालयातील या भ्रष्टाचाराचा कुठेतरी अंत होणे गरजेचे आहे. कारण हा भ्रष्टाचाराचा राक्षस संपूर्ण जिल्हा रुग्णालय यंत्रणेला आतून पोखरून काढत आहे. भविष्यात या भ्रष्टाचारातून एखादा मोठा गंभीर गुन्हा झाल्यास त्यास या भ्रष्टाचाराकडे दुर्लक्ष करणारे वरिष्ठ अधिकारीच जबाबदार असतील, हे खरे.सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन या दृष्टीने गेल्या अनेक महिन्यांपासून प्रयत्न करीत आहे आणि यापुढील काळात देखील प्रयत्न करीत राहणार आहे, हेही तितकेच खरे.

अजून बरेच काही पुढील भागात

## पाच लाख रुपयांसाठी विवाहितेचा छळ

**जनसंचलन/मोताळा**

गिट्टी तयार करण्याची मशीन आणण्यासाठी पाच लाख रुपयांची मागणी करीत विवाहितेचा छळ करण्यात आल्याची घटना ८ जूनच्या संध्याकाळी चार वाजेपुर्वी घडली आहे. प्रकरणी फिर्यादीवरून बोराखेडी पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अकोला जिल्ह्यातील बोरगाव मंजू येथे राहणारी आणि सध्या येथील आठवडी बाजार परिसरात वास्तव्यास असलेल्या एका २१ वर्षीय विवाहितेने बोराखेडी पोलीसात दिलेल्या फिर्यादीनुसार बोरगाव मंजू येथील नदीम शहा मुसा शहा, मुसा शहा रहमान शहा, नगीना



बी मुसा शहा, शरीफ शहा मुसा शहा आणी रजीया बी शरीफ शहा यांनी ८ जूनच्या संध्याकाळी चार वाजेच्या पूर्वी गिट्टी तयार करण्याची मशीन घेण्यासाठी पाच लाख रुपये घेऊन ये अशी मागणी केली. तसेच शिवीगाळ करीत मारहाण करून शारीरिक व मानसिक छळ केला आणी घरातून काढून दिले, अशी तक्रार विवाहितेने बोराखेडी पोलीसात केली. त्यावरून पोलीसांनी उपरोक्त पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## काशीच्या तुलसी घाटावर बुडून येऊलखेडच्या युवकाचा मृत्यू...

**जनसंचलन/ शेगाव**

शेगाव :तालुक्यातील येऊलखेड येथील २८ वर्षाच्या युवकाचा काशी येथील तुलसी घाटात बुडून मृत्यू झाल्याची घटना ६ जून रोजी घडली आहे. वाराणसी एक्सप्रेसने ४ जून रोजी अयोध्येला पाच मित्रांसह श्रीराम प्रभुच्या दर्शनासाठी जात असताना काशी येथे उतरून गंगा स्नान करीत असतांना पाण्याचा अंदाज आला नसल्याने शेगाव तालुक्यातील येऊलखेड येथील रहिवासी सागर दिनकर पुंडकर वय २८ या युवकाचा काशी येथील तुलसी घाटावर बुडून मृत्यू झाला आहे. सागर हा एकुलता एक होता. त्यामुळे त्याच्या कुटुंबियांचा तोच आधार होता. वडील दोन्ही डोळ्याने आंधळे असल्याने कुटुंबाची सर्व जबाबदारी सागर वरच होती. त्याला एक बहीण असून तिचे लग्न बाकी आहे. त्यामुळे पुंडकर कुटुंबाचा आधारच काळाने हिरावून घेतला आहे. सागरच्या मृत्यूची वार्ता कळताच संपूर्ण गावात शोककळा पसरली आहे. सागरचे प्रेत



काशी वरून विमानाने मुंबई औरंगाबाद व तेथून रुग्णवाहिकेने येऊलखेड येथे आणून अंत्यसंस्कार करण्यात आले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता प्रवीण पुंडकर यांचा तो पुतण्या होता.

# रक्षा खडसे यांनी घेतली मंत्रीपदाची शपथ



**वृत्तसंस्था/ रावेर**

रावे लोकसभा मतदारसंघात सलग तिसऱ्यांदा निवडून आलेल्या खासदार रक्षा खडसे यांची केंद्रीय मंत्रीपदी वर्णी लागली आहे. त्यानिमित्ताने मताधिक्य देणाऱ्या - मलकापूर विधानसभा मतदारसंघात भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. रावेर लोकसभा मतदारसंघात खा. रक्षा खडसे यांनी सलग तिसऱ्यांदा विजय संपादन करून विजयाची हॅटट्रिक साधली आहे. निवडणुकीदरम्यान त्यांच्यावर आरोप- प्रत्यारोपांच्या फैरी झाडल्या गेल्या होत्या, मात्र निरागस राजकारण त्यांच्या पथ्यावर पडले. त्यांनी सगळे नम्रपणे स्वीकारून वाटचाल केल्याने यश संपादन केले आहे. प्रचारादरम्यान, विकास कामांच्या मुद्द्यांवर खा. रक्षा खडसे यांना टार्गेट करण्यात आले होते. त्यांनीही रावेर मतदारसंघातील निवडणुकीकडे देशाची निवडणूक म्हणून बघावे, पंतप्रधान नरेंद्र मोदींसाठी भाजपला मतदान करावे, असे आवाहन वारंवार केले. त्याच धरतीवर संपूर्ण लोकसभा मतदारसंघात हिंदुत्वाच्या मुद्द्यांवर भरघोस मतांनी रक्षा खडसे विजयी झाल्या आहेत. रविवारी सायंकाळी त्यांचा शपथविधी पार पडला. त्याचबरोबर अनेक मंत्र्यांनी शपथ घेतली. त्यात रावेर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार रक्षा खडसे यांचादेखील शपथविधी पार पडला आहे. त्यामुळे मतदारसंघात जल्लोष करण्यात आला.

# दोन वर्षांपासून अर्धवट सोडलेल्या रस्त्यासाठी सरपंचासह ग्रामस्थांचे उपोषण...

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

सिंदखेडराजा तालुक्यातील किनगाव राजा येथील रस्त्याचे काम गत दोन वर्षांपासून ठेकेदाराने अर्धवट स्थितीमध्ये सोडलेला आहे सदर रस्ता ताबडतोब पूर्ण करावा या मागणीसाठी किनगावराजा येथील सरपंच प्रकाश मुंढे यांच्यासह ग्रा.पं. सदस्य संतोष काकड,ग्रामस्थ सूर्यकांत निंबाळकर व महादेव दराडे यांनी तारीख ७ जून पासून आमरण उपोषणास प्रारंभ केला असुन आज उपोषणाचा तिसरा दिवस आहे

किनगावराजा ते हिवरखेड रस्त्याचे बांधकाम गेली दोन वर्षांपेक्षाही जास्त दिवसांपासून सुरु असून सदर रस्ता अर्धवट स्थितीमध्ये सोडल्याने दररोज कामानिमित्त रस्त्यावरून ये - जा करणाऱ्यांना व अगदी रस्त्याच्या कडेला घरे असणाऱ्या ग्रामस्थांना अत्यंत त्रास होत आहे.राज्य महामार्गाला जोडणारा हा मुख्य रस्ता असल्याने ज्या ठिकाणी हा रस्ता अर्धवट सोडण्यात आला आहे तेथून येणाऱ्या चारचाकी व दुचाकी वाहनधारकांना आपापले वाहन चालवताना अपघात होऊ नये यासाठी तारेवरची कसरत करावी लागत आहे. दररोजच्या या त्रासामुळे कंटाळून तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता तसेच रस्त्याचे काम ज्यांनी घेतले आहे ते ठेकेदार हे सुद्धा वारंवार तक्रार देऊनही दुर्लक्ष्य करीत असल्याने गावच्या सरपंचासह ग्रामस्थांनी आठ दिवसांपूर्वी उपविभागीय अधिकारी,तहसीलदार व सार्वजनिक बांधकाम विभागास रस्त्याचे काम पूर्ण करा अन्यथा उपोषण करणार असा ईशारा निवेदनाद्वारे दिला होता परंतु तरीही सदर रस्त्याचे काम पूर्ण न केल्यामुळे उपोषणास प्रारंभ करण्यात आला असल्याचे उपोषणकर्त्यांनी सांगितले आहे. हिवरखेड पूर्णा रोडवर सकाळी ११ च्या दरम्यान उपोषण सुरू करण्यात आले असून या दरम्यान माजी आमदार शशिकांत खेडेकर यांनी उपोषणस्थळी भेट देऊन उपोषणकर्त्यांच्या मागणी संदर्भात चर्चा करून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना भ्रमणध्वनीद्वारे रस्त्यासंदर्भात सूचना दिल्या आहेत.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता बालाजी काबरे यांच्याशी संपर्क साधला असता जिल्हा कार्यकारी अभियंता यांना पत्र पाठवून सदर रस्त्याचे ठेकेदार रामा नाथा दराडे यांनी वेळेवर रस्त्याचे काम पूर्ण केले नसल्याने त्याच्यावर दररोज ५ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात येऊन सदर ठेकेदारचे नाव काळ्या यादीत समाविष्ट करण्यात यावे अशी मागणी केली असल्याचे सांगितले आहे.

ठेकेदार व सार्वजनिक बांधकाम विभागाचा कुठलाच समन्वय नसल्याचे यावेळी दिसून आले असून ग्रामस्थांना



मात्र याचा विनाकारण त्रास होत आहे. प्रशासनाकडूनही आमची समस्या दूर झाली नसल्यानेच आमरण उपोषण करीत असल्याचे सरपंचासह ग्रामस्थांनी सांगितले आहे. सदर उपोषणकर्ते यास हिवरखेड,विझोरा, निमगाव वायाळ,साठेगांव ग्रामपंचायतीने उपोषणास पाठिंब्याचा ठराव दिला आहे आज उपोषण सोडविण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे जेई महेश भाले आले असता उपोषण कर्ते यांनी अगोदर काम सुरु करा नंतर दोन दिवसांनी उपोषण आम्ही सोडतो असा आक्रमक भूमिका घेतली यावेळी विनायक पाटील भानुसे यांनी उपकार्यकारी अभियंता काबरे यांच्याशी भ्रमणध्वनी वर संपर्क साधून हा ठेकेदार वेळेत काम पूर्ण करीत नसल्याने संबंधितावर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे संबंधीत ठेकेदारावर राजकीय नेत्यांचा वरदहस्त असल्याने या ठेकेदारावर कुठलीच कारवाई दाखल होत नसल्याची परीसरात चर्चा आहे

# आरटीओची वाहन तपासणी मोहीम

**जनसंचलन/बुलडाणा**

उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे वाहन तपासणी मोहिम राबविण्यात येत आहे. यात नियमानुसार नसणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यात येणार आहे. वाहन तपासणी पथकाद्वारे रस्ता सुरक्षेच्या दृष्टिकोनातून विना क्रमांकाची वाहने, वेगमर्यादेपेक्षा अधिक वेगाने रस्त्यावर धावणारी वाहने, हेल्मेट परिधान न करता आढळून येणारी दुचाकी वाहने, तसेच फॅन्सी वाहन क्रमांक असणाऱ्या वाहनावर मोटार वाहन कायदा आणि नियमानुसार कारवाई करण्यात येत आहे. त्यामुळे वाहन चालविताना वाहन क्रमांक नियमानुसार असणे, वेगमर्यादेपेक्षा अधिक वेगाने वाहन चालवू नये. दुचाकी वाहने चालविताना हेल्मेटचा वापर करावा, फॅन्सी नंबरची वाहन चालवू नये. तसेच पालकांनी १८ वर्षापेक्षा कमी वय असलेल्या मुलांना गिअरची वाहने चालवायला देवु नये. याबाबत कारवाई करण्यात येणार आहे. असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी प्रसाद गाजरे यांनी कळविले आहे.

# सिंदखेडराजा तालुक्यात तीन टँकर मंजूर

**जनसचंलन/ सिंदखेडराजा**

जिल्ह्यातील सिंदखेड राजा तालुक्यात सद्यस्थितीत पिण्याच्या स्त्रोतापासून आवश्यक पाणी उपलब्ध होत नाही. त्यामुळे तीन गावांना टँकरने पाणीपुरवठा करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. दरेगाव, नागझिरी आणि शेंदुर्जन, ता. सिंदखेड राजा या तीन गावांना टँकरने पाणीपुरवठा करण्यास मंजूरी देण्यात आली आहे. दरडोई दरदिवशी २० लिटर्स उपलब्ध होण्यासाठी पाणीटंचाई निवारणार्थ उपाययोजना म्हणून टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येतो. त्यानुसार दरेगाव, नागझिरी आणि शेंदुर्जन येथे प्रत्येकी एका टँकरने पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. या तीन गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. यामुळे सदर गावामधील पाणीटंचाई कमी होण्यास मदत होणार आहे, असे उपविभागीय अधिकारी, सिंदखेड राजा यांनी कळविले आहे.

# जिल्ह्यातील ८ तलावांच्या लिलावाची कार्यवाही सुरू...

**जनसंचलन/बुलढाणा**

शासनाने सुधारीत तलाव, जलाशय धोरण जाहिर केले आहे. त्यानुसार सन २०२३-२४ वर्षाकरिता, जिल्ह्यातील ५०० हेक्टरखालील ८ तलाव मुदत दि. ३० जून २०२४ रोजी संपत आहे. या तलाव, जलाशयाच्या निर्धारित कार्यक्षेत्रातील मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थांना जिल्हास्तरीय तलाव ठेका समिती तलाव मासेमारी ठेका देणार आहे. सन २०२४-२५ वर्षाचे तलाव ठेका प्रक्रियेकरीता अटी-शतर्रींची पुर्तता करावी लागणार आहे. तलाव जलाशयावर नोंदणीकृत मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना ही पुर्तता करणे आवश्यक आणि बंधनकारक आहे. यासाठी संस्थेचा विहित नमुन्यातील मागणी अर्ज, संस्थेची एकुण सभासद संख्या व संचालक मंडळाची यादी, तलाव ठेका मागणीबाबतचा संस्थेचा ठराव, संस्था नोंदणी प्रमाणपत्र व उपविधीची प्रत, सहाय्यक निबंधक दुग्ध यांचे संस्था कार्यरत असल्याचे प्रमाणपत्र, सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांचे थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र, सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांचे नोंदणी ना-हरकत प्रमाणपत्र, मागील तीन वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल, तीन वर्षाचे बैंक स्टेटमेंट, १० टक्के मत्स्यबीज संचयनाचा अगाऊ रक्कमेचा धनादेश, मागील तीन वर्षाचा संस्थेचा नफा-तोटा, अटी-शर्ती हमी, प्रतिवर्ष मत्स्यबीज संचयन व मत्स्योत्पादन अहवाल, तसेच मागील ५ वर्षे तलाव ठेका कालावधीचे पंचनामे सादर करणे आवश्यक आहे. शासन निर्णयातील तरतूदीनुसार व अटी-शर्तीनुसार जिल्ह्यातील पाटबंधारे विभागाचे तलाव ठेका मुदत ३० जून २०२४ रोजी संपुष्टात आलेले तलाव नव्याने मासेमारीसाठी ठेक्याने देण्याचे प्रस्तावित आहे. याबाबतचा शासन निर्णय सहाय्यक आयुक्त, मत्स्य व्यवसाय (तांत्रिक), बुलडाणा येथे कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर उपलब्ध आहे, असे सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तांत्रिक) सु. ग. गावडे यांनी कळविले आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बालगृहाला जिल्हाधिकारी यांनी दिली भेट

## सहपरिवार भेटीने बालकांना मिळाला आधार!

**जनसंचलन/बुलढाणा**

बालगृह, दत्तक विधान संस्था लव्ह ट्रस्ट, तसेच आपत्कालीन परिस्थितीत महिला व मुलींचे संगोपन करण्याच्या सखी सेंटरला जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी सहपरिवार भेट दिली. या भेटीने अनाथ निराधार बालकांना आधार देऊन त्यांच्या पुनर्वसनासाठी सुरू असलेल्या कामांचा आढावा घेतला. महिला व बालविकास विभागांतर्गत कार्यरत महिला व बालकांच्या काळजी आणि संरक्षणाच्या दृष्टीने दाखल असणाऱ्या बालकांना जिल्हाधिकारी यांनी सहपरिवार भेट देऊन बालकांना मानसिक आधार दिला. जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी अनाथ मुलांना पालक मिळावे यासाठी विशेष प्रयत्न करण्याच्या सूचना दिल्या. तसेच बाल न्याय मंडळा मार्फत दाखल असलेल्या बालकांचे मानसिक आरोग्य चांगले रहावे याकरिता मानसिकतज्ज्ञ, मनोविकार तज्ज्ञांचा सल्ला आणि सेवा घेण्यात यावी, अशा सूचना दिल्या. यावेळी संस्थेतील दहावी उत्तीर्ण गुणवंत बालकांचा सत्कार करण्यात आला. जिल्हाधिकारी यांनी बालगृह भेटीनंतर दत्तक विधान संस्था दि लव्ह ट्रस्ट येथे भेट दिली. संस्थेतील सहा वर्षांपर्यंतच्या बालकांचे पोषण, देखरेख आणि आरोग्यविषयक बाबी समजून घ्याव्यात. सोडून दिलेले व दत्तक जाण्यासाठी मुक्त करण्यात येणाऱ्या बालकांची दत्तक विधान प्रक्रिया साधारण नागरिकांपर्यंत पोहोचावी. यासाठी प्रचार प्रसिद्धी करावी. नकोसे बाळ आढळल्यास सामाजिक संस्था आणि बाल संरक्षण यंत्रणांनी एकत्र येऊन कार्य करावे, अशा सूचना संस्थाचालक आणि महिला व बाल विकास विभागाला देण्यात आल्या. तसेच जिल्ह्यात विविध क्षेत्रात कार्यरत सामाजिक संस्थांना सहभागी करून अर्थसहाय्य आणि मदत उपलब्ध करून देण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले. धार्मिक ठिकाण, आरोग्य केंद्रे आणि मुद्रांक नोंदणी आणि निबंध




कार्यालय अशा ठिकाणी बालकांचे कायदेशीर समर्पण करणाऱ्या माता आणि कुटुंबांची गोपनीयता पाळून समुपदेशनाचे काम करावे. संस्थेत दाखल अनाथ बालकांसाठी विशेष आरोग्य चाचण्या आणि सोयीसुविधा मिळण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत. संकटात सापडलेल्या आणि आधाराची गरज असणाऱ्या सखी सेंटरवर जिल्हाधिकाऱ्यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी संस्थेतील महिला व मुलींशी संवाद साधला. वास्तव्यास असणाऱ्या मुलींच्या सुरक्षित हस्तांतरणाबद्दल मार्गदर्शन केले. संस्थेत दाखल मुलींच्या शिक्षण आणि कौशल्य विकास उपक्रमांबाबत त्यांनी निर्देश दिले.

# विजेचा शॉक लागून एकाचा मृत्यू

**जनसंचलन/मोताळा**



विजेचा धक्का लागल्याने ए ३४ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना ९ जून रोजी सकाळी सात वाजेच्या सुमारास वडगाव येथे घडली आहे. अनिल महादेव लोखंडे असे मृतकाचे नाव आहे. या प्रकरणी फिर्यादीवरून बोराखेडी पोलीसात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. तालुक्यातील वडगाव येथील अनिल महादेव लोखंडे या ३४ वर्षीय व्यक्तीला विजेचा शॉक लागल्याची घटना ९ जून रोजी सकाळी सात वाजेच्या सुमारास वडगाव गावात घडली आहे.या घटनेत गंभीर झालेल्या अनिल लोखंडे यांना ग्रामस्थांनी येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. पोलिसांनीही आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

# आवकाळी पावसामुळे शेडनेटचे लाख रुपयाचे नुकसान

## शेतकरी हवालदिल शासनाकडून मदतीची अपेक्षा!

**जनसंचलन/ चिखली**



चिखली तालुक्यातील मौजे मंगरूळ येथे शासनाच्या पोखरा योजनेअंतर्गत मंगरूळ येथील आठ ते दहा शेतकरी यांनी शेडनेट हाऊसची पोखरा योजनेअंतर्गत शेडनेटचे उभारणी केली होती. आज शेती ही निसर्गाच्या भरोशावर परवडत नाही म्हणून काही शेतकरी आधुनिक शेती कडे वळले आहेत आणि काही शेतकरी आधुनिक शेती करण्याला सुरुवात केली आहे परंतु निसर्गाच्या आसमानी आणि सुलतानी संकटामुळे मंगरूळ येथील परमेश्वर सुरुशे योगेश बाडे बांडे संजय गवते दामोदर शिंदे प्रकाश गवते गजानन वरपे अनिल सुरुशे सखाराम सुरुशे व इतर काही शेतकऱ्याचे लाखो रुपयांचे नुकसान झालेले आहे शेडमध्ये आलेला माल निसर्गाच्या वादळी पाऊस व वाऱ्यामुळे शेडनेटचे अतोनात नुकसान झाले आहे आज शेतकरी हा देशोधडीच्या मार्गावर आहे परंतु महसूल विभाग आणि कृषी विभाग या शेतकऱ्याला कोणत्या प्रकारची मदत करते यावर सदर नुकसानग्रस्त शेतकऱ्याचे लक्ष लागून आहे

# धनंजय मुंडेंकडून राज्यातील शेतकऱ्यांसाठी कृषी तक्रार व्हाट्सअप क्रमांक जारी

## बी-बियाण्यांची चढ्या भावाने विक्री, बोगस वाण विक्री,अनावश्यक खरेदीची सक्ती आदी बाबींची थेट तक्रार करता येणार; तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवणार

**जनसंचलन/बुलढाणा**




कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी एक दिवस आधी राज्याच्या खरीप हंगामाच्या नियोजनाचा आढावा घेतला. त्यावेळी त्यांनी शेतकऱ्यांसाठी कृषी तक्रार व्हाट्सप हेल्पलाईन क्रमांक जारी करण्याचे निर्देश दिले, त्याप्रमाणे कृषी विभागाकडून ९८२२४४६६५५ हा व्हाट्सप क्रमांक जारी करण्यात आला आहे. राज्यात कुठेही कृषी निविष्ठा विक्रेते शेतकऱ्यांना विविष्ट कंपनीचे बियाणे किंवा खत घेण्याची सक्ती करत असतील, बी-बियाणे, खते किंवा कीटक नाशकांची चढ्या भावाने विक्री करत असतील, अनावश्यक वस्तू खरेदी करण्याची सक्ती करत असतील, एखादे बोगस वाण विक्री करत असतील, किंवा अशा काही तक्रारी असतील, त्या तक्रारी शेतकऱ्यांनी दुकानाचे नाव, ठिकाण झ तालुका, जिल्हा यांसह उपलब्ध असलेल्या पुराव्यासह वरील व्हाट्सप क्रमांकावर पाठवावेत. त्या प्रत्येक तक्रारीची तातडीने दखल घेऊन, त्याची शहानिशा करून त्यावर कारवाई केली जाईल, त्याचबरोबर तक्रार देणाऱ्या शेतकरी बंधू-भगिनींचे नाव पूर्णपणे गोपनीय ठेवले जाईल, अशी माहिती धनंजय मुंडे यांनी दिली आहे. मागील वर्षी देखील धनंजय मुंडे यांनी हा अभिनव उपक्रम राबविला होता. त्याद्वारे हजारो तक्रारींची सोडवणूक करण्यास मदत मिळाली होती. त्यामुळे याही वर्षी हा उपक्रम राबविण्याचा निर्णय धनंजय मुंडे यांनी घेतला असून, सदर व्हाट्सप क्रमांक कार्यान्वित करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे बुलढाणा जिल्ह्यासाठी ७५८८०४१००८ आणि ७५८८६१९५०५ हे दोन क्रमांक कार्यान्वित करण्यात आल्याबाबत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बुलढाणा यांनी कळविले आहे.

# शेतीच्या वादातून महिलेला अश्लील शिविगाळ

**जनसंचलन/ खामगाव**



शेतीच्या वादातून एका महिलेस अश्लील शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याची घटना शहरातील सनी पॅलेस परिसरात घडली. याप्रकरणी तक्रारीवरून पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारीनुसार शारदा अनिल बुंदेले ४१ आणि रमेश आकाराम बंदेले ५० यांच्यात शेतीच्या वादातून न्यायालयात प्रकरण सुरू आहे. दरम्यान, रमेश बुंदेले याने गुरुवारी सायंकाळी अश्लील शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला. याप्रकरणी शारदा बुंदेले यांच्या तक्रारीवरून उपरोक्त आरोपी विरोधात गुन्हा दाखल केला.

# पंतप्रधान पदाची नरेंद्र मोदी यांनी घेतली तिसऱ्यांदा शपथ

वृत्तसंस्था/नवी दिल्ली

आधी २०१४... नंतर २०१९... त्यानंतर आता सलग तिसऱ्यांदा मोदी ३.० च्या पर्वाला सुरुवात झाली आहे. नरेंद्र मोदींनी सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली आहे. मी नरेंद्र दामोदर दास मोदी... असं म्हणत त्यांनी तिसऱ्यांदा गोपनियतेची शपथ घेतली. त्यांच्यासोबत एनडीएच्या ३६ नेत्यांनी मंत्रिपदाची शपथ घेत आहेत. दिल्लीच्या राष्ट्रपती भवनात शपथविधी सोहळा पार पडला. या कार्यक्रमासाठी देशभरातून आणि जगभरातून पाहुण्यांना आमंत्रित करण्यात आले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मंत्रिमंडळातील ७१ मंत्री शपथ घेणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः ७२ वे मंत्री म्हणून शपथ घेणार आहेत. मोदी ३.० कॅबिनेटमध्ये ३० कॅबिनेट मंत्री, ५ राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) आणि ३६ राज्यमंत्री शपथ घेणार आहेत.नवी दिल्लीतील राष्ट्रपती भवनात नरेंद्र मोदींनी पंतप्रधान पदाची शपथ घेतली. नरेंद्र मोदी यांनी गोपनियतेची शपथ घेतली आहे. त्यांच्यासोबत एनडीएच्या काही दिग्गज नेत्यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली आहे. यात राजनाथ सिंह, अमित शाह, नितीन गडकरी, जेपी नड्डा, निर्मला सीतारामन, शिवराज सिंह चौहान यांचा समावेश आहे. भाजप नेते अमित शहा यांनी कॅबिनेट मंत्रीपदाची शपथ घेतली. यापूर्वीच्या सरकारमध्ये अमित शहा केंद्रीय गृहमंत्री होते. ते चार वेळा गुजरातचे आमदार होते. गांधीनगर मतदारसंघातून सलग दुसऱ्यांदा खासदार झाले. राजनाथ सिंह यांनी मोदी ३.० कॅबिनेटमध्ये मंत्री म्हणून शपथ घेतली. राजनाथ सिंह मागील सरकारमध्ये संरक्षण मंत्री होते. ते लखनौचे नवनिर्वाचित खासदार आहेत. भाजप नेते आणि नवनिर्वाचित खासदार नितीन गडकरी यांनी सलग तिसऱ्यांदा कॅबिनेट मंत्रीपदाची शपथ घेतली. गडकरी हे मोदींच्या मागील दोन्ही सरकारमध्ये कॅबिनेट मंत्री होते. त्यानंतर भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा आणि मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी कॅबिनेट मंत्रिपदाची शपथ घेतली. निर्मला सीतारामन यांनी कॅबिनेट मंत्री म्हणून शपथ घेतली. एस जयशंकर यांनी नवीन सरकारमध्ये कॅबिनेट मंत्री म्हणून शपथ घेतली. हरियाणाचे माजी मुख्यमंत्री मनोहर लाल खट्टर यांनी मोदी ३.० कॅबिनेटमध्ये मंत्री म्हणून शपथ घेतली.नरेंद्र मोदींच्या शपथविधी सोहळ्यात शेजारील देश आणि इतर देशांतील अनेक नेते सामील झाले. यात श्रीलंकेचे राष्ट्रपती रानिल विक्रमसिंघे, मालदीवचे राष्ट्रपती मोहम्मद मुइज्जू, बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना, सेशेल्सचे उपराष्ट्रपती अहमद अफिफ, भूतानचे पंतप्रधान शेरिंग तोबगे, नेपाळचे पंतप्रधान पुष्पाजी. कमल दहल प्रचंड, मॉरिशसचे



पंतप्रधान प्रविंद कुमार जुगनाथ यांनी उपस्थिती लावली होती. तसेच भारतातील अनेक दिग्गजांनीही या शपथविधी सोहळ्याला उपस्थिती लावली होती. यात सुपरस्टार रजनीकांत, गौतम अदानी,राजनाथ सिंह, कंगना रणौत यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# जिल्ह्याचे भूमिपुत्र खासदार प्रतापराव जाधव यांनी घेतली मंत्रीपदाची शपथ...

जनसंचलन/बुलढाणा

केंद्रीय राज्यमंत्रिपदाचा २२ वर्षांचा बुलढाणा जिल्ह्याचा दुष्काळ संपवत सलग चौथ्यांदा विजयी होण्याचा विक्रम करणारे खासदार प्रतापराव जाधव यांच्या रूपाने बुलढाणा जिल्ह्याला केंद्रात आतापर्यंतचे तिसरे राज्यमंत्रिपद मिळाले आहे. दरम्यान, मातृतीर्थ बुलढाणा जिल्ह्याचे भूमिपुत्र म्हणून ते पहिलेच केंद्रीय राज्यमंत्री ठरले आहेत. १८ व्या लोकसभा निवडणुकीमध्ये सलग चौथा विजय मिळवत त्यांनी एक विक्रम आधीच केला होता. आता जिल्ह्याचे भूमिपुत्र म्हणूनही केंद्रीय राज्यमंत्रिपद मिळविणारे ते एकमेव आहेत. आपल्या ३९ वर्षांच्या कारकिर्दीमध्ये त्यांनी बुलढाणा जिल्ह्याच्या राजकारणावर चांगली पकड मिळवली आहे. दरम्यान, निकालानंतर मुंबईमध्ये जाऊन त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेत दिल्ली गाठली होती. दुसरीकडे त्यांच्याशिवाय मंत्रिपदाच्या शर्यतीमध्ये अनेक जणांची नावे होती. परंतु त्यांची ज्येष्ठता, सलग चार वेळा निवडून येणे आणि १९९५ च्या युती शासनाच्या काळात पाटबंधारे राज्यमंत्रिपदाचा सोबतच सलग चार ग्रामविकास व पंचायतराज समितीचे अध्यक्ष तथा संवाद व माहिती तंत्रज्ञान समितीचे एक वर्ष अध्यक्षपद त्यांनी भूषविलेले असल्याने मंत्रिपदाच्या शर्यतीमध्ये त्यांचे पारडे जड ठरले आणि केंद्रीय राज्यमंत्री म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मंत्रिमंडळात त्यांना स्थान मिळाले, या व्यतिरिक्त राजकारणाचा प्रदीर्घ अनुभव, भाजपाच्या नेत्यांशी असलेले त्यांचे चांगले संबंध तसेच



शिवसेनेतील उठावादरम्यान एकनाथ शिंदेसाठी त्यांनी केलेली खासदारांची जुळवाजुळव ही त्यांच्यासाठी पूरक ठरली. विशेष म्हणजे बुलढाण्यातून त्यांनी उद्धवसेनेच्या प्रा. नरेंद्र खेडेकर यांचाही पराभव केला आहे. त्यामुळे शिंदेसेनेचे सर्वेसर्वा तथा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या नावाची शिफारस केली होती.

# मशागतीच्या कामात यंत्रांचा वापर !

## किनगाव जट्टू परिसरात रोटावेटरला मिळतेय पसंती

जनसंचलन/किनगाव जट्टू

खरीप हंगामास सुरुवात झाली असून ७ जूनपासून मृग नक्षत्र सुरू झाले आहे. आतापर्यंत किनगाव जव परिसरात तुरळक स्वरूपाचा पाऊस पडल्याने शेतकऱ्यांनी मशागतीच्या कामांना वेग दिला आहे. पेरणीपूर्व मशागतीच्या कामांसाठी शेतकरी यंत्रांना प्राधान्य देत असून रोटावेटर करण्याकडे शेतकऱ्यांचा कल असल्याचे चित्र आहे. मृग नक्षत्रास सुरुवात झाली असून यावर्षी वेळेत आणि चांगला पाऊस पडणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची पेरणीपूर्व मशागतीसाठी लगबग सुरू आहे. बहुतांश शेतकऱ्यांनी पेरणीपूर्व मशागत करण्यासाठी पारंपरिक बैल जोडीऐवजी ट्रॅक्टरला पसंती दिल्याचे दिसून येते. नांगरणी, वखरणी ही कामे ट्रॅक्टरने करण्यास प्राधान्य दिले जात आहे. तथापि वखरणी केल्यानंतरदेखील शेतात पुन्हा केरकचरा राहत असल्याने मजूर लावून वेचावा लागत आहे. यात वेळ व पैसा खर्च होत असल्यामुळे अनेक शेतकरी रोटावेटरला पसंती देत आहेत. रोटावेटरमुळे शेतातील कचरा मशीनच्या साह्याने सहजपणे बारीक होऊन त्याचे खतात रूपांतर होते. परिसरात यंदाच्या खरीप हंगामात सोयाबीनला पसंती राहणार असून ज्या शेतकऱ्यांकडे सिंचनाची व्यवस्था आहे त्यांनी काही प्रमाणात कपाशीची लागवड सुरू केली आहे.

# अवैध धंद्यांविरुद्ध पोलिसांची धडक मोहीम

जनसंचलन/ नांदुरा

पोलिसांनी अवैध धंद्यांविरुद्ध मोहीम हाती घेऊन दारूबंदी कायद्याअंतर्गत तीन दारू अड्ड्यांवर कारवाई करण्यात आली. या कारवाईत चार हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. प्राप्त माहितीनुसार, अंकुश समाधान दशरथे (३०, रा. रणगाव, ता. मलकापूर) यांच्याविरुद्ध कारवाई करून त्याच्या ताब्यातून २१०० रुपयांची देशी दारू तसेच सतीश तेजराव धुरंधर (३५), रा. आमसरी, तालुका खामगाव यांच्या ताब्यातून १०६० रुपयांचा मुद्देमाल आणि सुनील रामभाऊ नितोने (३४ वर्षे, रा. अंबादेवी गडाजवळ नांदुरा) याच्याविरुद्ध कारवाई करून याच्या ताब्यातून एक हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवायांमध्ये पोलिसांनी ४१६० रुपयांचा दारूसाठा जप्त केला. त्याचवेळी जुगार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत कारवाई करून सुनील जनार्दन घोराडे (५०, रा. वडी, ता. नांदुरा) याच्याकडून जुगाराचे नगदी १०५० रुपये व वरली मटका आकडे लिहिलेल्या चिठ्या असा मुद्देमाल जप्त केला.

# खतांचा कृत्रिम तुटवडा भासवून शेतकऱ्यांची लूट !

जनसंचलन/मलकापूर पांगरा

रासायनिक खते दरवाढ होणार असल्याच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. सरकारच्या दबावामुळे कंपन्यांनी भाववाढ तूर्तास टाळली असली तरी मलकापूर पांग्रासह सिंदखेड राजा तालुक्यात खतांचा कृत्रिम तुटवडा दाखवून शेतकऱ्यांची लूट करण्यात येत आहे. याकडे कृषी विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे. खरीप हंगामापूर्वी रासायनिक खतांची दरवाढ होणार असल्याची चर्चा होती. या दरवाढीला शेतकऱ्यांनी जोरदार विरोध केल्याने सरकारने खत निर्मिती करणाऱ्या कंपन्यांना तूर्तास भाव वाढ थांबवण्याचे आदेश दिले होते. सध्या रासायनिक खतांची दरवाढ झालेली नसली तरी जे पाहिजे ते खत मिळत नसल्याचे चित्र आहे. गेल्या वर्षी खरिपाच्या हंगामात अत्यल्प पाऊस व अवर्षणामुळे पिकांचे अपेक्षित उत्पन्न झाले नाही. त्यामुळे शेतकरीवर्ग आर्थिक संकटात सापडला आहे. खरिपातील तोटा रब्बीच्या पिकांत भरून काढण्यासाठी शेतकऱ्यांनी रब्बी पिकांची पेरणी केली होती. मात्र अवकाळीने पिकांचे नुकसान झाले.